# बृहन्मुंबई महानगरपालिका

**विषय:** एन विभाग प्रभाग क्र.123/124 व प्रभाग क्र.125/133 मधील ठिकठिकाणी प्रभाग निहाय Deep Cleanliness Drive उपक्रम राबविण्याकरीता सेक्शननिहाय मनुष्यबळ (श्रमदिन) उपलब्ध करुन देण्यासाठी संस्थांची नव्याने नियुक्ती करण्याबाबत.

## स्वारस्य अभिव्यक्ती

## जाहिरात

'एन' विभाग घन कचरा व्यवस्थापन खात्यात प्रभाग क्र.123/124 व प्रभाग क्र.125/133 मधील ठिकठिकाणी प्रभाग निहाय Deep Cleanliness Drive उपक्रम राबविण्याकरीता सेक्शननिहाय मनुष्यबळ (श्रमदिन) उपलब्ध करुन साफसफाईच्या कामाकरीता 'एन' विभाग कार्यालयाच्या सेक्शननिहाय प्रभाग क्र.123/124 व प्रभाग क्र.125/133 मधील नोंदणीकृत कामाचा अनुभव असणा-या इच्छुक स्थानिक मजुर सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, बेरोजगार सेवा सहकारी संस्था, अशासकीय संस्था इ. संस्थेमार्फत कामगारांचा पुरवठा करण्याकरीता तसेच स्वयंसेवकातर्फे योजना राबविण्याकरीता संस्थेची निवड, पात्रता यादी तयार करुन सोडत पद्धतीने निवड करुन काम करण्यासाठी अर्ज मागवीत आहे.

| अ.क्र | कामाचे ठिकाण | कामासाठी निवड करावयाच्या संस्था | अर्जाचे शुल्क (रु.) |
|---|---|---|---|
| 1 | प्रभाग क्र.123/124 | 1 | रु.1452/- अधिक 18 टक्के GST एकूण रु.1714/- अनामत रक्कम रू.6000/- |
| 2 | प्रभाग क्र.125/133 | 1 | |

अर्जाचा नमुना **'एन'** विभाग कार्यालयातील सहाय्यक अभियंता (घन कचरा व्यवस्थापन) यांचेकडे अर्जाचे शुल्क रोख स्वरुपात किंवा राष्ट्रीयकृत बँकेचा डी.डी. **'बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त'** (BRIHANMUMBAI MUNICIPAL CORPORATION) या नावाने (ना-परतावा) नागरिक सुविधा केंद्र (C.F.C.) येथे जमा केल्यानंतर दि.11.08.2025 ते दि.18.08.2025, सकाळी 10.30 ते दुपारी 04.00 यावेळेत मिळु शकेल. पात्र संस्थांची यादी व सोडतीचा दिनांक एन विभाग कार्यालय येथे सुचना फलकावर लावण्यात येईल. पात्र संस्थांच्या यादीमधुन सोडत पद्धतीने यशस्वी झालेल्या संस्थांना कामाचे वाटप संबंधीत विभागाचे सहाय्यक आयुक्त योजनेच्या अटी व शर्तीनुसार करतील.

इच्छूक संस्थांनी अधिक तपशिल, अर्ज व शपथपत्राच्या नमुन्यासाठी **'एन'** विभाग घन कचरा व्यवस्थापन कार्यालयात संपर्क करावा. संस्थेने **'एन'** विभाग कार्यालयात अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख दि.19.08.2025 दुपारी 03.00 वाजेपर्यंत आहे.

नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधी नंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत.

**सही/-**

**सहाय्यक आयुक्त 'एन'**